**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६०६/ २००९/ पुणे | श्री. भास्कर आबाजी वायाळ अणुजीव विभाग, राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे-१ | प्रशासकीय अधिकारी, राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे-१ | अपिलीय प्राधिकारी, राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे-१ | वेतनश्रेणी बदलाचा लाभ मिळणेबाबत, तसेच दि. १२.१. २००७ रोजी केलेल्या अर्जावर कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबतची माहिती | अपीलकर्त्याची मूळ मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीची आहे. माहिती- मागणीच्या अर्जामध्ये त्यांनी नमूद केलेल्या अर्जावर कोणती कार्यवाही केली, याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी. |
| २ | ६७३/ २००९/ पुणे | श्री. प्रकाश हरिश्चंद्र मोरे २६८/२, औंधगाव, पुणे-७ | विभागीय वाहतुक अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, पुणे-३७ | विभागीय लेखा अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, पुणे-३७ | तिकिट पुस्तकांच्या प्रती, माहे मे २००८ ची देय रक्कम, मूळ वेतन, पगारपत्रक, सेवा पुस्तकाच्या पहिल्या व शेवटच्या पानाची छायांकित प्रत इ. माहिती. | अपीलकर्त्याने दोन वेगवेगळ्या माहिती अर्जांकरिता आयोगाकडे एकच अपील केले आहे. वेगवेगळ्या माहिती अर्जांकरिता आयोगाकडे स्वतंत्रपणे अपिले करणे आवश्यक आहे. |
| ३ | ७३९/ २००९/ पुणे | प्रा.संपत माधव त्रिभुवन भिमार्थ, इंगळेनगर, सिध्दार्थ कॉलनी, वारजे नाका, पुणे-५२ | मुख्याध्यापक, हडपसर विद्यालय, रासटेकडी, पुणे-१३ | शिक्षणा- धिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे | श्री. आर.एम. पटणे व सौ. आर. आर.पटणे या उपशिक्षकांचे अनुभव प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता इ. माहिती | जन माहिती अधिकाऱ्यांनी सरसकट माहिती नाकारणे योग्य नाही. श्री. व सौ. पाटणे यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबतच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी. संस्थेकडील माहिती जन |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माहिती अधिकाऱ्यांनी घेऊन द्यावी. संस्थेकडे व विद्यालयाकडे नसलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर योग्य आहे. |
| ४ | ६७४/ २००९/ पुणे | श्री. गोविंद लक्ष्मणराव बनसोडे राज्य परिवहन, विभागीय भांडार, दापोडी, पुणे-१२ | कामगार अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, शंकरशेठ रोड, पुणे-३७ | विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, शंकरशेठ रोड, पुणे-३७ | माहे जानेवरी २००९ ते मार्च २००९ या कालावधीतील श्री. शेटे, कामगार यांच्या मासिक दैनंदिनीची व पत्र क्र.राप/विनिपु /काअपु/२५९६ दि. २३.१०.२००१, पत्र क्र.राप/विनिपु/काअपु /१५९६ दि. २६.७.२००२ व राप/मुकाआ/११६ दि. २९.१.२००५ या पत्रांच्या प्रमाणित प्रती | अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ बाबत माहिती ८ दिवसांच्या आत जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करून द्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यातील एकूण ४ अपिले अनुक्रमांक १ ते ४ ( अपील क्र. ६०६ / २००९ /पुणे, ६७३/२००९/पुणे, ७३९/२००९/पुणे, व ६७४/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ६०६/२००९/पुणे, ६३९/२००९/२००९/पुणे व ६७४/२००९/ पुणे मधील जन माहिती अधिकारी यांनी निष्कर्षात आदेशित केल्यानुसार अपीलकर्त्याला १० दिवसांत माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

पुणे

दि. २८.७.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय श्रीपती डवरी
मु.पो.तुरंबे, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत),
कोल्हापूर जिल्हा परिषद, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक (ग्रामपंचायत विभाग),
कोल्हापूर जिल्हा परिषद, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६२४ /कोल्हा/ २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय श्रीपती डवरी
मु.पो.तुरंबे, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर तर्फे ॲड.प्रशांत शामराव भावके

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत),
कोल्हापूर जिल्हा परिषद, जि.कोल्हापूर श्री.एम.व्ही.चौगुले

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक (ग्रामपंचायत विभाग),
कोल्हापूर जिल्हा परिषद, जि.कोल्हापूर श्री.आर.एम.पोळ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.२.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि.९.९.२००८ ते २८.११.२००८ या कालावधीतील कंत्राटी ग्रामसेवक भरतीसंदर्भातील माहिती. दि.९.९.२००८ रोजी दिलेल्या जाहिरातीत भज-ब प्रवर्गाच्या दोन जागा होत्या, त्या जागा का वगळण्यात आल्या याची सविस्तर माहिती. दि.२३ नोव्हेंबर २००८ रोजी मी दिलेल्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत व उमेदवारांची गुणांसह यादी मिळावी. | |

## विवेचन

कंत्राटी ग्रामसेवक पदाच्या भरतीसाठी घेतलेल्या परीक्षेतील आपल्या उत्तरपत्रिकेची प्रत गुणांसह आपल्याला मिळावी व भज-ब प्रवर्गातील रिक्त जागा या भरतीच्या सुधारित जाहिरातीतून का वगळण्यात आल्या याची माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.दत्तात्रय श्रीपती डवरी यांनी जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), कोल्हापूर जिल्हा परिषद यांच्याकडे केली होती. उत्तरपत्रिका गोपनीय असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिकारी श्री.एम.व्ही.चौगुले यांनी माहिती नाकारली. त्याविरुध्द श्री.डवरी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. आरक्षित पदांच्या बदलाबाबत तोंडी विवेचन करुन उत्तरपत्रिका नाकारण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय ग्राह्य ठरविणारा निर्णय श्री.चौगुले यांनीच अपिलीय प्राधिकारी म्हणून दिला. त्याविरुध्द श्री.डवरी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२९.५.२००९ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सदरच्या अपिलाची आयोगासमोर सुनावणी घेण्यात आली.

कंत्राटी ग्रामसेवक परीक्षेसाठी आधी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत भज-ब प्रवर्गासाठी दोन जागा आरक्षित होत्या. सुधारित जाहिरातीत ती एक जागा केली. आपण आधीच्या जाहिरातीनुसार अर्ज केला असल्यामुळे पुन्हा अर्ज करण्याची गरज नसल्याचे आपल्याला अधिकाऱ्यांनी सांगितले. भरतीत आपली निवड झालेली नाही, परंतु भज-ब प्रवर्गातील आरक्षित जागा अद्याप रिक्त आहे. आपल्याला प्राप्त झालेले गुण व उत्तरपत्रिकेची प्रत मिळाल्यानंतर आपण निवडीसाठी योग्य असल्याचे स्पष्ट होईल, म्हणून आपल्याला गुणांसह ही प्रत मिळावी, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.डवरी यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. जन माहिती अधिकारी म्हणून आपल्याला माहिती नाकारणाऱ्या अधिकाऱ्यांनीच अपिलीय प्राधिकारी म्हणून आपले अपील नाकारले, मात्र अपिलाच्या निर्णयात वेगळे कारण दिले. एकाच अधिकाऱ्याने अशा प्रकारची दोन्ही पदे धारण करणे योग्य नसल्याची तक्रार श्री.डवरी यांनी लेखी व तोंडी केली. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ च्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने उत्तरपत्रिका गोपनीय असल्याचा जो आदेश काढला, त्यानुसार व माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ८(झ) प्रमाणे उत्तरपत्रिका गोपनीय असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या नियमावलीनुसार उत्तरपत्रिका गोपनीय असल्याचा हवाला दिला आहे. तो येथे लागू नाही, असे प्रतिपादनही श्री.डवरी यांनी केले. अपील क्र.२००६/२३/०२ मध्ये राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांनी शालांत परीक्षेच्या उत्तरपत्रिका गोपनीय असल्याचा निर्णय दिला आहे. त्यानुसार आपले म्हणणे योग्य आहे व त्यानुसार उत्तरपत्रिका न देण्याचा निर्णय योग्य असल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.आर.एम.पोळ व अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.व्ही.चौगुले यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील नमूद केले आहे. त्याचाच पुनरुच्चार त्यांनी आयोगापुढील सुनावणीत केला.

श्री.डवरी यांनी अर्ज केला तेव्हा आपण जन माहिती अधिकारी होतो. त्यानंतर बदललेल्या व्यवस्थेत आपण अपिलीय प्राधिकारी झालो, म्हणून अपिलाचा निर्णय आपण दिला, त्यात फरक नाही, असा खुलासा श्री.एम.व्ही.चौगुले यांनी केला. संबंधित उत्तरपत्रिका अन्य संस्थेकडून तपासून घेतल्या जातात, त्यामुळे आपल्याकडे कोऱ्या उत्तरपत्रिका येतात. त्यावर गुण नसतात, असेही श्री.चौगुले यांनी नमूद केले.

'दि.२७.८.२००८ च्या शासन निर्णयानुसार कोल्हापूर जिल्हा परिषद करिता ग्रामसेवकांची नवीन ३१ व ग्रामविकास अधिकाऱ्यांची १८ अशी एकूण ४९ पदे मंजूर करण्यात आली होती. त्यामुळे सरळ सेवेने ४५ कंत्राटी ग्रामसेवकांची नवीन पदे भरण्याबाबतची जाहिरात दि.९.९.२००८ रोजी प्रसिध्द करुन त्या त्या रिक्त पदांच्या अनुषंगाने व आरक्षणाप्रमाणे अर्ज मागविण्यात आले होते. भज-ब प्रवर्गाकरिता त्यात एकूण दोन पदे आरक्षित होती. त्यानंतर शासनाने स्थगिती दिल्यामुळे ही जाहिरात रद्द झाल्याचेही वृत्तपत्रांतून प्रसिध्द केले होते. त्यानंतर शासनाने पुन्हा दि.१.११.२००८ च्या शासन निर्णयान्वये पदांमध्ये वाढ करुन ग्रामसेवकांची ६१ पदे मंजूर केली. त्यातील भज-ब प्रवर्गाकरिता दोन पदे आरक्षित करण्यात आली. परंतु ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांकरिता १० टक्के पदे आरक्षित ठेवतेवेळी भज-ब चा कर्मचारी उपलब्ध झाल्यामुळे सुधारित जाहिरातीमध्ये फक्त एक आरक्षित पद भरण्याची जाहिरात दि.७.११.२००८ राजी प्रसिध्द करण्यात आली. सुधारित जाहिरातीमध्ये भज-ब करिता पद उपलब्ध नव्हते, मात्र ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी त्यांची आरक्षित पदे उपलब्ध नसतानादेखील अर्ज केले आहेत अशा उमेदवारांना खुल्या वर्गात समाविष्ट करुन लेखी परीक्षेकरिता प्रवेश देण्यात आला होता. रिक्त पदांच्या अनुषंगाने सर्व बाबी उमेदवारांना त्यावेळी स्पष्ट करण्यात आलेल्या होत्या,' असे निवेदन श्री.चौगुले यांनी लेखी व तोंडी केले. या अनुषंगाने श्री.डवरी यांनी नेमणुकीबाबत उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका न्यायालयाने फेटाळली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

उत्तरपत्रिकांच्या गोपनीयतेबाबतचा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा अन्वयार्थ आयोग अमान्य करीत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये शासकीय कारभारातील पारदर्शकता केंद्रिभूत आहे. शासकीय सेवेत कर्मचाऱ्यांच्या भरतीसारख्या प्रक्रियेत ही पारदर्शकता अत्यंत आवश्यक असून एखाद्या उमेदवाराने दिलेल्या परीक्षेतील त्याची स्वतःची उत्तरपत्रिका त्याच्यापासूनच गोपनीय ठेवता येणार नाही. तसेच परीक्षेत सर्वांना मिळालेले गुण समजण्याचा उमेदवाराचा हक्क आहे, म्हणून उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत व उमेदवारांच्या गुणांचा तक्ता ही माहिती श्री.डवरी यांना (अन्वयार्थाच्या मतभेदामुळे माहिती नाकारल्याचे लक्षात घेता) योग्य ते शुल्क आकारुन पंधरा दिवसात द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार श्री.डवरी यांनी शुल्क भरणा केल्यानंतर संबंधित उत्तरपत्रिकेची छायाकित प्रत त्यांना देण्यात आली. तसेच दि.७.११.२००८ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या आरक्षणानुसार मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या गुणांचा तक्ता त्यांना देण्यात आला. आसन क्र.०९४९ (श्री.डवरी) या उमेदवारास (१८० पैकी) १७५ गुण प्राप्त झाले आहेत, असा अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) श्री.एम.व्ही.चौगुले यांनी आयोगाला दि.८.७.२००९ रोजी सादर केला आहे. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार पूर्तता झाली असल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा**
अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

ॲड. सलीम शेख
ऑफिस नं.९५, १ला मजला, ईस्ट स्ट्रीट गॅलेरिया,
२४२१, ईस्ट स्ट्रीट, कॅम्प, पुणे-१

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
पूना कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स व कॉमर्स,
कॅम्प, पुणे-४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**, पूना कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स व कॉमर्स,
कॅम्प, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४२+६४३+७२३+७२४+८०९ / पुणे + तक्रार-०६ |
| २ | सुनावणीची तारीख | २८.१.२००९ (अंतिम सुनावणी) |

३ उपस्थित

**अपीलकर्ता** ॲड. सलीम शेख
ऑफिस नं.९५, १ला मजला, ईस्ट स्ट्रीट गॅलेरिया,
२४२१, ईस्ट स्ट्रीट, कॅम्प, पुणे-१

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
पूना कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स व कॉमर्स,
कॅम्प, पुणे-४११ ००१ डॉ. मोहमद कुद्रतुल्ला

**जन माहिती अधिकारी**, पूना कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स व कॉमर्स,
कॅम्प, पुणे-४११ ००१ प्रा. शकील अहमद

## मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

सन १९९०-९१ ते २००५-०६ या शैक्षणिक वर्षात १२ वी सायन्स मध्ये पास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या, १२ वी सायन्स पास होऊन एफ.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एससी. मध्ये सन १९९०-९१ ते २००५-०६ या वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची तुकडीवार व सालवार संख्या, १२ वी सायन्स पास झालेले; परंतु ट्रान्स्फर सर्टिफिकेट घेतलेल्या विद्यार्थ्यांची सन १९९०-९१ ते २००५-०६ या कालावधीची यादी, १२ वी सायन्स पास झालेल्या; परंतु ज्यांनी एफ.वाय.बी.कॉम. मध्ये प्रवेश घेतला अशा विद्यार्थ्यांची संख्या, एफ.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एससी. मध्ये प्रवेशासाठीची वर्गवारी, ज्युनिअर व सिनीअर कॉलेजमधून प्रवेश रद्द करण्यात आल्यानंतर फी परत करण्याबाबत असलेले नियम व तरतुदी, तसेच प्रवेश नाकारण्यात आल्यानंतर जमा झालेल्या फी बाबत व इतर अनुषंगिक माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम (४) नुसार स्वयंस्फूर्तीने जाहीर करावयाच्या माहितीचा दस्तऐवज इ.

## विवेचन

अपीलकर्ता ॲड. श्री. सलीम शेख यांनी अंजुमन खैरूल इस्लाम या संस्थेच्या पूना कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स व कॉमर्स, कॅम्प, पुणे या महाविद्यालयाबाबतची इयत्ता १२ वीच्या विज्ञान शाखेला प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीपासून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ अन्वये सार्वजनिक प्राधिकरणांनी स्वयंस्फूर्तीने जाहीर करावयाच्या माहितीपर्यंत विविध विषयांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी अर्ज स्वीकारत नाहीत, प्रथम अपिलावरील निर्णयही जन माहिती अधिकारीच देतात, कोणतीही माहिती दिली जात नाही, कलम ४ नुसार कोणतेही दस्तऐवज तयार केलेले नाहीत व अवलोकनासाठी उपलब्ध करून दिले जात नाहीत, अशा कारणांवरून ॲड. शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकूण पाच अपिले व एक तक्रारी अर्ज दाखल केला आहे.

आयोगाने दि. १२.६.२००८ व दि. २७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. सदर कार्यक्रमात उभय बाजूंचे एकमत न झाल्यामुळे, तसेच जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, पूना कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स व कॉमर्स, कॅम्प, पुणे काही वेळा सुनावणीला उपस्थित न राहिल्यामुळे आयोगाने दि. २९.९.२००८ व दि. १३.१०.२००८ या सुनावणीच्या तारखांनंतर दि. २८ जानेवारी २००९ या दिवशी अंतिम सुनावणी ठेवली. महाविद्यालयाच्या अपिलीय प्राधिकाऱ्यांची गैरहजेरी, वेगवेगळे वकील देणे, मुदत व सुनावणीच्या पुढील तारखा मागणे अशा बाबी संस्थेतर्फे आढळून आल्या. पुनःपुन्हा तारखा देऊन सुनावणी पुढे जाणार नाही, अशा स्पष्ट सूचना आयोगाने संबंधितांना दिल्या.

ॲड. शेख यांच्या माहिती-मागणीविषयीच्या अर्जांना महाविद्यालयाकडून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये आवश्यक असलेला प्रतिसाद मिळाला नाही. आपली संस्था अल्पसंख्यांक संस्था असल्यामुळे तिला हा कायदा लागू होत नाही, अशी भूमिका जन माहिती अधिकारी, पूना कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स व कॉमर्स, कॅम्प, पुणे प्रा. शकील अहमद व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, पूना कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स व कॉमर्स, कॅम्प, पुणे डॉ. मोहमद कुद्रतुल्ला यांनी सातत्याने घेतली. त्याविरूध्द ॲड. शेख यांनी विद्यापीठ अनुदान मंडळ, नवी दिल्ली, शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक); पुणे, उप संचालक, (उच्च शिक्षण), पुणे विभाग, कुलसचीव; पुणे विद्यापीठ, पुणे या वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे /नियंत्रक विभागांकडे; पत्रव्यवहार केला. पूना कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स व कॉमर्स, कॅम्प, पुणे हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येते, त्यामुळे माहिती दिली पाहिजे, असे या सर्व अधिकाऱ्यांनी महाविद्यालयाला कळविले होते, असे ॲड. शेख यांनी संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रतींसह नमूद केले. या नंतरही आपल्याला माहिती मिळाली नाही, व अभिलेखाचे अवलोकन करू दिले गेले नाही, असे निवेदन त्यांनी सातत्याने लेखी व तोंडी स्वरूपात केले.

प्रारंभी माहिती अधिकारातील अर्ज स्वीकारले जात नव्हते, परंतु शिक्षण संचालकांनी सूचना दिल्यानंतर अर्ज स्वीकारले जातात, असे प्राचार्य डॉ. मोहमद कुद्रतुल्ला यांनी सांगितले. 'ॲड. शेख हे महाविद्यालयाच्या स्थानिक समितीत आपल्याला घेण्याच्या मागणीपासून विशिष्ट विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत आग्रह धरतात', येथपर्यंत विविध स्वरूपाचे आरोप जन माहिती अधिकारी प्रा. शकील अहमद व अपिलीय प्राधिकारी प्राचार्य डॉ. मोहमद कुद्रतुल्ला यांनी लेखी स्वरूपात सुनावणीच्या वेळी केले. ॲड. शेख यांनी या सर्व आरोपांचा इन्कार केला व महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देताना गैरप्रकार होत असतात, असा आरोप लेखी व तोंडी केला. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना संधी देऊनही त्यांनी माहिती न देण्याबाबतची व आरोपांना पुष्टी देणारी कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत. ॲड. शेख यांनी प्रवेश व गैरप्रकारांच्या आरोपांना पुष्टी देणारी कागदपत्रे सादर केली नाहीत. ॲड. शेख हे सातत्याने माहितीची मागणी करणारे अर्ज करीत असतात. माहितीपेक्षा केवळ त्रास देण्याचा त्यांचा हेतू आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. मोहमद कुद्रतुल्ला यांनी संबंधित अर्जांच्या तपशिलासह केले. दोन-दोन वर्षे उलटूनही आपल्याला माहिती मिळत नाही, म्हणून आपल्याला वारंवार अर्ज व तक्रारी कराव्या लागतात, असे प्रतिपादन ॲड. शेख यांनी केले.

उभय बाजूंमधील मतभेद, आरोप - प्रत्यारोप हा माहिती मागणे व देणे - न देणे यातील मुख्य गाभा असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांतून व त्यांच्या मौखिक निवेदनातून स्पष्ट होते. संस्था

अल्पसख्यांक असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो की नाही, हा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या निवेदनातील एक प्रमुख मुद्दा आहे. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अल्पसंख्यांकत्व आदि निकषांवर अशा प्रकारची कोणतीही सूट दिलेली नाही, त्यामुळे संस्थेचा हा दावा अमान्य करण्यात येत आहे.

प्रारंभीच्या कायदेशीर सल्ल्यानुसार आपण तसे प्रतिपादन केले होते. परंतु हा अन्वयार्थ चुकीचा असल्याचे नंतरच्या कायदेशीर मार्गदर्शनानुसार आपण स्वीकारले असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ सह सर्व बाबींची पूर्तता व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती देण्याची व्यवस्था आता केली आहे, असे प्राचार्य डॉ. कुद्रतुल्ला यांनी पूरक कागदपत्रांसह विस्ताराने नमूद केले. कागदपत्रांबाबत आपण खात्री करून घेतली असल्याचे सांगून ॲड. सलीम शेख यांनी प्राचार्य डॉ. कुद्रतुल्ला यांचे निवेदन मान्य असल्याचे प्रतिपादन केले. प्रा. अहमद व प्राचार्य डॉ. कुद्रतुल्ला यांनी ॲड. शेख यांच्यावर केलेले सर्व आरोप मागे घेतल्याचे व त्यांची बिनशर्त माफी मागणारे निवेदन दि. २९.१.२००९ रोजी आयोगाला सादर केले. कायद्याच्या अन्वयार्थातील प्रारंभीची चूक दुरूस्त करून पूना कॉलेजचे उप प्राचार्य व प्राचार्य यांनी आयोगाला सादर केलेले निवेदन व आवश्यक माहितीची पूर्तता यामुळे आपले समाधान झाले असून त्यांना शास्ती करण्याची मागणी आपण मागे घेत आहोत, असे लेखी निवेदन ॲड. शेख यांनी आयोगाला सादर केले. आपले आरोप मागे घेत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

एका शैक्षणिक संस्थेविषयीच्या संदर्भातील वादाच्या अनुषंगाने उभय बाजूंनी एकमताने सादर केलेले निवेदन स्वीकारून, शास्ती व अन्य कारवाई न करण्याची विनंती आयोग मान्य करीत आहे. मात्र या पुढील काळात माहितीच्या अधिकाराबाबत अंजुमन खैरूल इस्लाम संस्थेने व पूना कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स व कॉमर्स, कॅम्प, पुणे यांनी योग्य प्रकारे कार्यवाही करावी, अशी सक्त सूचना आयोग देत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

वर नमूद करण्यात आलेली तक्रार व अपिले (क्रमांक ६४२+६४३+७२३+७२४+८०९ / पुणे + तक्रार-०६/ पुणे) नाकारण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२०.७.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६५२ / पुणे | श्री. किशोर वसंतराव कुऱ्हाडे रा. १९५५, कुऱ्हाडेवाडा, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे | मुख्याधिकारी, आळंदी नगर-परिषद, आळंदी, ता. खेड, जि. पुणे | उप आयुक्त, (सामान्य प्रशासन ), पुणे विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे-१ | आळंदी नगर परिषद हद्दीतील स.नं.१९ब, सि.स.नं.१२५९ पैकी नगरपालिकेच्या नावे असलेल्या जागेची माहिती मिळणेबाबत | मुख्याधिकारी, नगर परिषद, आळंदी यांनी दि. १५.५.२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली आहे. अपीलकर्त्याची पोहच प्राप्त आहे. |
| २ | ७०१ / पुणे | श्री. मल्हार एस.आर.रेक्टरंट कॉप्रि.बी/१०२, हिरानंदानी इस्टेट घोडबंदर पाडा, ठाणे-४०० ६०७ | निवासी नायब तहसीलदार, मुळशी, ता.मुळशी, जि.पुणे | तहसीलदार, मुळशी, ता.मुळशी, जि.पुणे | मौजे ताथवडे, ता. मुळशी येथील जमीन स.नं.५१/२ /११ यातील फेरफार क्र.३७०० वर नोंद करताना झालेला हस्तदोष महसूल अधि-नियमातील कलम १५५ प्रमाणे दुरूस्ती | अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसून प्रशासकीय कार्यवाहीत येते. मात्र संबंधित मागणीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी १५ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ३०१६ + ३१००/ पुणे | श्री. विजय दौलतसिंग मदन विजय व्हिला, व्हिजन हॉस्पिटल जवळ, विसे मळा, कॉलेज रोड, शरणपूर रोड, नाशिक-५ | सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, कर आकारणी व कर संकलन कार्यालय, पुणे महानगर-पालिका पुणे | उप आयुक्त, कर आकारणी व कर संकलन कार्यालय, पुणे महानगरपालिका पुणे | पुणे महानगर-पालिका हद्दीतील "गुरूप्रसाद को. ऑप. हौ. सोसायटी मर्यादित" या नावाने ओळखली जाणारी मालमत्ता तत्संबंधी १ ते ४ मुद्दयांची माहिती मिळणेबाबत | सहाय्यक कर आकारणी व कर संकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे यांचेकडील दि.२७.५.०९ रोजीचे पत्रान्वये माहिती दिली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनुक्रमांक १ ते ३ (क्र. ६५२, ७०१ व ३०१६ + ३१००/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ७०१/पुणे मध्ये निष्कर्षात आदेशित केल्यानुसार संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती देऊन अनुपालन अहवाल आठ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तद्नुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि. ०४ .७.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६७०/ २००९/ सोलापूर | ॲड. राजेंद्र अनंतराव चौधरी डी - २, अवंतीनगर, पुणे रोड, सोलापूर | कार्यालयीन अधीक्षक, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | सहायक आयुक्त (स.), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | सोलापूर महानगर - पालिकेमध्ये वर्ग ३ ची दोन कनिष्ठ श्रेणी लिपिक पदे व वर्ग ४ चे एक मंजूर पद प्रकल्पग्रस्तांच्या मधून भरण्यात आलेली आहेत. सदर प्रकल्प - ग्रस्तांच्या दाखवल्याची प्रत व नेमणुकीच्या तारखा मिळणेबाबत. | प्रकल्पग्रस्त दाखले व नेमणूक आदेश यांच्या प्रती अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे, ही बाब सार्वजनिक हिताशी निगडीत आहे. जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसांत अपील - कर्त्यास माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. |
| २ | ८११/ २००९/ सोलापूर | श्री. संजय भगवान भोसले मु. पो. रोपळे बु //, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | माहिती अधिकारी, पंचायत समिती पंढरपूर, जि. सोलापूर | अपिलीय प्राधिकारी, पंचायत समिती पंढरपूर जि. सोलापूर | दि. ६.१०.२००८ दि. १५.१२.२००८ व दि. २.२.२००९ च्या लोकशाही दिनातील तक्रार अर्जाच्या चौकशी अहवालाच्या नकला मिळणेबाबत. | अपीलकर्त्याने अपीलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ३ | १४४५/ सोलापूर | श्री. गुलाम हुसेन कासीमसाहेब शेख ६१०/११, उत्तर कसबा, सोलापूर | वरिष्ठ पोलिस निरीक्षक, जेलरोड, पोलीस स्टेशन, सोलापूर शहर, सोलापूर | पोलीस उप आयुक्त, सोलापूर शहर, सोलापूर | गोवंश हत्या बंदी कायदा, पोलीस कारवाई व पोलिसांचे अधिकार इ.बाबत एकूण ३ इत्यादी मुद्द्यांची माहिती. | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि. १६.७.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' तील प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १४८०/ सोलापूर | श्री. बाबासाहेब मळसिध्द कदम मु.पो. भंडारकवडे, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत भंडारकवडे, ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, दक्षिण सोलापूर जि. सोलापूर | १५%, २२१/२, ५०% या प्रमाणे सुधारणा योजनेची माहित, सदर योजनेवर झालेला खर्च, इस्टीमेंट मुल्यांकन दाखले, शिल्लक रक्कम मुद्दयांची माहिती. | अपीलकर्त्यास आवश्यक माहिती १५ दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १६.७.२००९ रोजीच्या 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | १५१९/ सोलापूर | श्री. राजेंद्र सर्जेराव करचे मु. पो. पिंपरी, ता.माळशिरस, जि. सोलापूर | ग्रामसेवक ग्रामपंचायत पिंपरी, ता.माळशिरस, जि. सोलापूर | विस्तार अधिकारी पंचायत समिती माळशिरस, जि. सोलापूर | मौजे पिंपरी येथील हरियाली योजने - अंतर्गत गट वनीकरण केलेल्या जमिनीचे गट, नंबर तसेच माहे जून २००६ ते माहे नोव्हेंबर २००६ या कालावधीत झालेल्या कामांच्या मस्टरच्या प्रती. | अपील चालविण्याची इच्छा नाही, असे अपीलकर्त्याने दि.१४.७.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) वरील तक्त्यातील एकूण ५ अपिले (अपील क्र ६७०/२००९/सोलापूर, ८११/२००९/सोलापूर, १४४५/सोलापूर,१४८०/सोलापूर, व १५१९/सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील ६७०/२००९/सोलापूर, १४८०/सोलापूर या अपिलांमध्ये विहित मुदतीत माहिती देण्याचे नमूद केले आहे, तेथे पूर्तता करून सबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अनुपालन अहवाल आयोगास त्वरित सादर करावा. अन्यथा सबंधित जन माहिती व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि.३१ .०७.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातीलमागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७३१/ २००९/ सोलापूर | श्री. सूर्यकांत नामदेव बुधवंतराव मु. पो. येवती, ता. मोहोळ, जि. सोलापूर | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग, पुणे | संचालक अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग, पुणे | श्री. अमर औदुंबर बुधवंतराव याचे वैधता प्रमाणपत्रासाठी जोडलेली सर्व कागदपत्रे मिळणेबाबत. | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ११ (१) अन्वये सबंधितांची लेखी समंती असल्याशिवाय माहिती देता येत नाही, हे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. |
| २ | ७५२/ २००९/ सोलापूर | श्री. अजीज लाला फुलारी ट्रान्झिट कॅम्प, रूम नं १०, पहिला मजला, जुनेदनगर कम्पाउन्ड, सी. डी. बर्फीवाला मार्ग, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ५८ | नगर भूमापन अधिकारी, सोलापूर | अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, सोलापूर | सोलापूर येथील जोडभावी पेठ सि. क्र. ९२०५/१९३, घर क्र. ९४/१९३ या जागेवर कोर्टाचा हुकूमनामा कोणत्या दिनांका पासून व कोणाच्या नावे आहे. या अनुषंगाने एकूण ०७ मुद्दयांची माहिती. | माहिती तयार आहे. विहित शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले उत्तर योग्य आहे. अपील - कर्त्यांने आवश्यक तर माहिती शुल्क भरुन प्राप्त करून घ्यावी. |
| ३ | ७५३/ २००९/ सोलापूर | श्री. वसंत गोविंद खांडेकर मु.पो.डोंबाळवाडी (कुरबावी), ता. माळशिरस, जि. सोलापूर | सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी. लि., सवंसू | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., सवंसू | सन १९८८ ते दि. २०.९.२००७ या कालावधीतील अपीलकर्त्याच्या असेसमेंटची प्रत, मीटर वाचननोंद कार्डची प्रत व | माहिती तयार आहे, विहित शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले उत्तर योग्य आहे. अपील - |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | उपविभाग नातेपुते, ता.माळशिरस, जि. सोलापूर | उपविभाग नातेपुते, ता.माळशिरस, जि. सोलापूर | थकबाकी भरणेसाठी दिलेल्या नोटीसीच्या पोचची छायाप्रत अशा एकूण १६ मुद्दयांची माहिती. | कर्त्याने आवश्यक तर माहिती शुल्क भरुन प्राप्त करून घ्यावी. |
| ४ | ७५९/ २००९/ सोलापूर | ॲड.आबासाहेब गोपाळराव पाटील मु. पो.खामगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर | मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी बार्शी , ता. बार्शी, जि. सोलापूर | गतीमान पाणलोट भूविकास योजनेअंतर्गत मंजूर असलेली गावे त्यांची अंदाजपत्रके, मोजमाप, लेबर रिपोर्ट इत्यादी माहिती | अपीलकर्त्याने अपीलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ५ | ७६७/ २००९/ सोलापूर | व्यवस्थापक, स्वामी समर्थ सहकारी बँक लि., ए - वन चौक, स्टेशन रोड, अक्कलकोट, जि. सोलापूर | व्यवस्थापक, स्वामी समर्थ सहकारी बँक लि., ए - वन चौक, स्टेशन रोड, अक्कलकोट, जि. सोलापूर | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर | श्री. मार्कंडय कोंगारी यांनी विशेष अधिकारी, स्वामी समर्थ सहकारी बँक लि. अक्कलकोट यांच्या सबंधात माहिती मागितली होती. अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलकर्त्यास माहिती देण्याचे आदेश दिले होते या आदेशा - विरूध्द जन माहिती अधिका-यांनी आयोगाकडे अपील केले आहे. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ नुसार अपील व्यक्तीच्या नावे करणे आवश्यक आहे, पदनामाने नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

वरील तक्त्यातील एकूण ५ अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र.७३१/सोलापूर ७५२/ २००९/ सोलापूर,७५३/२००९/सोलापूर,७५९/२००९/सोलापूर, व ७६७/२००९/सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि.३०.०७.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर मारुती कोंढाळकर
बी-१, मुक्तानंद हौसिंग सोसायटी,
चव्हाणनगर, धनकवडी, पुणे-४३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, भोर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
भोर तहसील कार्यालय, भोर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३९ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रभाकर मारुती कोंढाळकर
बी-१, मुक्तानंद हौसिंग सोसायटी,
चव्हाणनगर, धनकवडी, पुणे-४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, भोर, जि.पुणे डॉ.रेखा सोळंके

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
भोर तहसील कार्यालय, भोर, जि.पुणे श्री.एफ.अे.शेख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे कांबरे खे.बा.येथील गट नं.६२३ मधील झालेल्या खरेदीखताच्या नोंदीत, ७/१२ ला इतर हक्कामध्ये श्री.निखील नामदेव पोमण, श्री.आबासाहेब बबन कोंढाळकर, सौ.मिनाक्षी बाळासाहेब मोहिते, सौ.रजनी तानाजीराव मोहिते यांच्या नावाची नोंद केली आहे अगर कसे, केली असल्यास चालू ७/१२ त्वरित मिळावा. | |

## विवेचन

मौजे कांबरे खे.बा. येथील गट नं.६२३ या जागेला नावाची नोंद होण्याच्या संदर्भातील माहिती व ७/१२ उतारा अपीलकर्ता श्री.प्रभाकर मारुती कोंढाळकर यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, ता.भोर यांच्याकडे मागितला होता. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, भोर यांच्याकडून उत्तर आले नाही व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, भोर यांनी अपिलाची दखल घेतली नाही, या कारणावरुन श्री.कोंढाळकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाच्या दि.२७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सदर अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

गट नं.६२३ बाबत फेरफार नं.१२३६ चा निर्णय झाला आहे असे समजते, परंतु अद्याप कागदपत्रे मिळाली नाहीत. महसूल खात्यातील नोंदी किती त्रासदायक आहेत हे यावरुन दिसून येते, असे श्री.कोंढाळकर यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे, तर प्रकरण निर्णयावर असल्याने प्रलंबित होते, आता माहिती उपलब्ध झालेली असून ती सत्वर देण्यात

येत आहे,' असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, भोर यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

आपण मागितलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, भोर श्री.रामलिंग चव्हाण यांनी विहित मुदतीत दिली नाही म्हणून त्यांना शास्ती करावी, अशी मागणी श्री.कोंढाळकर यांनी आयोगापुढील सुनावणीत केली. संबंधित विषय खरेदी जमिनीबाबतच्या हरकतीमुळे निर्णय प्रलंबित होता, आता निर्णय झाला असल्यामुळे माहिती त्वरित देऊ, असे श्री.शेख यांनी नमूद केले. आयोगाचे पत्र गेल्यानंतर प्रलंबित प्रकरणाचा निर्णय झाला आहे, असे प्रतिपादन श्री.कोंढाळकर यांनी केले. परंतु संबंधित निर्णय दोन महिन्यांपूर्वीच झाला असून महत्त्वाच्या शासकीय कामकाजामुळे तो कळविण्यास मंडल अधिकाऱ्यांना विलंब लागला, असे श्री.शेख यांनी नमूद केले.

'अर्जदार यांना आवश्यक लागणारी माहिती या कार्यालयात उपलब्ध आहे, त्याप्रमाणे दि.११.६.२००८ रोजी अर्जदार यांना कळविण्यात आले असून त्यांना अलाहिदा आवश्यक कागदपत्र घेऊन जाण्याबाबत इकडून कळविण्यात आलेले आहे. तसेच अर्जदार यांनी सदरचे अपील काढून टाकणेची संमती दिली आहे. मात्र तलाठी/सर्कल यांच्याकडून खरेदी-विक्रीचे व्यवहाराच्या नोंदीस विलंब होत असल्याने त्यामध्ये सुधारणा होणे गरजेचे असल्याची मागणी केली आहे. दि.११.६.२००८ रोजी समक्ष सूचना दिल्याप्रमाणे सादर करण्यात येते की, शासनाचे प्रचलित धोरणानुसार दि.२८.४.२००८ पासून सब रजिस्ट्रार कार्यालयामध्ये झालेल्या व्यवहाराची नोंदीवर त्वरित फेरफार क्रमांक देण्यात येऊन जमीन देणार यांना नोटिसा त्वरित पाठविण्यात येतात व मुदतीनंतर त्यावर निर्णय देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे खातेदारांचे कामास विलंब होणार नाही असे इकडील मत आहे.'असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, भोर, ता.भोर, जि.पुणे यांनी दि.१२.६.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

संबंधित प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, भोर श्री.रामलिंग चव्हाण यांनी आयोगाला सादर करावा असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला.

श्री.कोंढाळकर यांचे दि.१३.६.२००८ रोजी माहिती मिळाल्याचे नमूद करणारे निवेदन आयोगाला दि.१०.७.२००८ रोजी प्राप्त झाले. झालेल्या विलंबाबद्दल जन माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, असे नमूद करुन श्री.कोंढाळकर यांनी अपील निकाली काढण्यास आपली हरकत नसल्याचे या निवेदनात म्हटले आहे.

श्री.कोंढाळकर यांनी खरेदी केलेले क्षेत्र राजगड सहकारी साखर कारखान्याकडे तारण म्हणून दिले असून कर्जाचा बोजा इतर हक्कात दाखल आहे. म्हणून खरेदीपत्रकाची नोंद मंजूर करण्यात येऊ नये, अशी हरकत साखर कारखान्याने नोंदविली. त्याच्या निर्णयासाठी प्रकरण तहसीलदार, भोर यांच्या समोर ठेवण्यात आले होते. दि.११.७.२००७ रोजी त्यांनी हे प्रकरण निर्णयासाठी मंडल अधिकारी, नसरापूर यांच्याकडे वर्ग केले. त्याकामी चौकशीचे कामकाज चालू असल्याचे व निर्णय झाल्यावर कळविण्यात येईल, असे पत्र दि.२३.७.२००७ रोजी श्री.कोंढाळकर यांना पाठविले होते. त्यांचा मूळ अर्ज दि.६.१.२००७ चा असून त्याचे उत्तर दि.५.२.२००७ रोजी पाठविले होते. त्यावेळी कळविलेल्या शुल्क भरण्याच्या दि.२३.२.२००७ च्या पत्रातही नमूद केलेले होते. परंतु आपणाकडून पाठपुरावा न झाल्याने अर्ज निकाली काढण्यात आला आहे, असे त्यांच्या अपिलानंतर दि.१९.४.२००७ रोजी त्यांना कळविण्यात आले, असे श्री.चव्हाण यांनी संबंधित कागदपत्रांच्या प्रतीसह नमूद केले आहे. मंडल अधिकारी, नसरापूर यांच्या पातळीवर निर्णयाला झालेल्या विलंबामुळे निर्णयाची माहिती अपीलकर्त्याला आपण मुदतीत देऊ शकलो नाही. मंडल अधिकारी, नसरापूर यांनी दि.२६.३.२००८ रोजी निकाल दिला असला तरी वारंवार विचारणा करुनही आपल्याला त्यांनी सांगितले नाही. सदर केसमध्ये अंतिम निकाल दिल्याबाबत मला मंडल अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक अंधारात ठेवले याबाबतचे रहस्य कळून येत नाही, असे श्री.चव्हाण यांनी दि.२२.१०.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व त्यांची निवेदने लक्षात घेता प्रकरण निर्णयासाठी प्रलंबित असल्यामुळे त्याबद्दलची माहिती देण्यास विलंब झाला आहे. (माहिती मागणारा अर्ज दि.६.२.३००७ रोजीचा असून प्रकरणाचा निर्णय दि.२६.३.२००८ रोजी झाला आहे.) अन्य माहितीबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत पत्रव्यवहार केला आहे. मात्र मंडल अधिकारी व निवासी नायब तहसीलदार यांच्यात सुसूत्रीकरणाचा अभाव व त्यामुळे नागरिकाला निर्णय कळण्यासही विलंब अशी स्थिती वरील बाबींवरुन दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये गाभाभूत असलेली सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता व उत्तरदायित्व या तत्त्वांशी विसंगत अशी ही स्थिती आहे. उपविभागीय अधिकारी, भोर उपविभाग, पुणे, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यांनी याबाबत लक्ष घालून आवश्यक ती सुधारणा करावी, व केलेली कार्यवाही आयोगास पंधरा दिवसांत अवगत करावी, असे निर्देश आयोग देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.७.२००९